# ब्रिटिश कालीन भारतीय प्रबोधन एक सम्यक आकलन

**डॉ. के.जी. सूर्यवंशी**
इतिहास विभाग प्रमुख,
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,
जालना

**प्रास्ताविक -**

१७५७ च्या प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया रोवला गेला. १७५७ या काळात सत्तेचा विस्तार होत गेला. ही सत्ता दृढ झाली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेच्या या काळात भारतात अनेक बदल घडून आले. १८१८ पर्यंत जवळजवळ संपूर्ण भारतात ब्रिटिशांनी आपली सत्ता स्थापन केली. या काळात त्यांनी ज्या सुधारणा केल्या त्याचे कोणते सामाजिक, धार्मिक, आर्थिक परिणाम झाले आणि भारत आधुनिक ज्ञान, विज्ञान, प्रबोधनासाठी तयार होत होता.

ख्रिस्ती धर्म प्रसार बरोबरच भारतात पाश्चात्त्य शिक्षणाची सुरुवात झाली. सुधारणावादी संस्था उदयाला आल्या त्याचबरोबर समाज सुधारकांनी समाजासाठी मोठी योगदान केले.[१] छापखाण्याच्या शोधा नंतर मुद्रण कलेत वाढ होत गेली. त्यातून वृत्तपत्रे वाढीस लागली तशी भारतातही वृत्तपत्रे निघत गेले विविध भाषेतील वृत्तपत्रे भारतात निघू लागली. याच काळात ब्रिटिशांनी भारतातील सामाजिक परिस्थिती अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, त्याचे परिणाम लक्षात घेऊन त्या दृष्टीने आणि कायदे केले. यातून भारतामध्ये नवविचाराची सुरुवात होऊन प्रबोधन होत गेले. [२]

**तथकालीन भारतीय सामाजिक परिस्थिती :-**

सामाजिक क्षेत्रामध्ये धर्म, रुढी यांच्यामुळे जागतिक व्यवस्था, कुटुंब व्यवस्था व विवाह संस्था यांच्यावर फार मोठी बंधने लादली गेली. मध्ययुगीनकाळी जाती संस्थेचे स्वरूप भिन्न होते. जातीचा व्यवसाय ठरलेला होता. आपल्या जातीचा व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय केल्यास त्या व्यक्तीला लोकांचा रोष सहन करावा लागे.[३] जाती संस्थेने व्यवसाय व्यतिरिक्त इतरही अनेक जाचक बंधने व्यक्तीवर घातलेली होती. जातही जन्मापासून ठरत असे. व्यक्तीला विवाह संबंध फक्त आपल्याच जातीत जोडता येत होते. यामुळे भारतीय समाजात एक फार मोठी जातीय विषमता निर्माण झाली.[४] ब्रिटिशांच्या सत्ता स्थापनेमुळे भारतात मोठे परिवर्तन घडून येत होते. त्यांनी फार मोठ्या प्रमाणात प्रशासकीय बदलास सुरुवात केली त्यामुळे भारतीय समाज व्यवस्थेला आमुलाग्र बदलास चालना मिळाली.

**कंपनी सरकारने केलेले सुधारणा कायदे :-**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात कंपनी सरकारने विविध कायदे संमत करून हिंदू समाजातील काही अनिष्ट चालीरीती बंद केल्या. लॉर्ड बेटीकचा काळ तर सामाजिक सुधारण्यासाठी एक नवे युग म्हणून साकारले. प्रजेचे कल्याण साधने, शांतता प्रस्थापित करणे आधी धोरणाचा अवलंब बेटीकने केला. [५]

**१८१७ चा कायदा :-**

या कायद्याने बनारसच्या ब्राह्मणांना जे काही खास अधिकार होते त्या अधिकारात ते इतरांना काही विशिष्ट गुन्ह्याबद्दल देह दंडाची शिक्षा देत असत. ब्रिटिशांनी त्या संदर्भात खास कायदा करून हा त्याचा अधिकार रद्दबातल ठरविला. [६]

**१८२९ चा कायदा :-**

हा कायदा म्हणजे सती बंदीचा कायदा होय. सती जाण्यामागची प्राचीन कालीन भूमिका काहीही असली तरी ही चाल विकृत स्वरूपात भारतात प्रचलित होती. पती निधनानंतर त्याच्या पत्नीने स्वतःला त्याच्या चितेवर जाणून घेण्याची चाल ही खऱ्या अर्थाने अ मानवीय होती कालबाह्य आणि अघोरी असणारी ही चाल लॉर्ड बेंटकने कायद्याने बंद करून ही दृष्ट व अमानुष चाल बंद केली. राजाराम मोहन राय यांच्या आग्रहाच्या विनंतीवरून ही सतीची चाल प्रथम बंगालमध्ये बंद केली. नंतर संपूर्ण देशात बंद करण्यात आली. [७]

**१८३२ चा कायदा :-**

हिंदू धर्मशास्त्रानुसार जर एखाद्याने धर्म बदलला तरी त्याचा संपत्तीवरील हक्क नाहीसा होत असे, परंतु या कायद्याने धर्म बदलाला तरी त्याचा संपत्तीवरील हक्क अबाधित ठेवण्याची तरतूद करण्यात आली. हा कायदा म्हणजे ख्रिस्ती धर्मात आलेल्यांचा किंवा येऊ इच्छिणाऱ्या फायद्यासाठी सरकारने योजलेली युक्ती होती अशी टीका झाली. [८]

**१८३६ चा कायदा :-**

पूर्वी भारतात राजे लोकांच्या पदरी पुष्कळ शिपाई असत. पुढे काही काळाने अनेक शिपाई बेकार झाल्याने जंगलात व डोंगराळ भागात आश्रय घेत. तेथून जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना लुटत असत व त्यांचा खून करत असत. काही वेळेला कालीमातेला बळी देण्याचा हा प्रकार भयंकर असा होता. हे लोक ठग या नावाने प्रसिद्ध होते. तेव्हा त्यांचा बंदोबस्त करण्याचे काम करणार स्लीमन याने स्वीकारले. सतत सात वर्ष प्रयत्न करून त्याने ठगाचा पूर्व बंदोबस्त केला अनेकांना देहांत शिक्षा मिळाल्या शरण आलेल्यांना क्षमा करून त्यांना उद्योग धंद्याला लावले. अशाप्रकारे ठगाचा बंदोबस्त करून हे आघोरी चाल बंद करण्यात आली. [९]

१८४० चा कायदा, १८४३ चा कायदा, १८५६ चा कायदा अशा या कायद्याने अनेक महत्त्वपूर्ण कामे करून लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. पूर्वीच्या काळी या देशात जमीनदार,

सरदार, उमराव हे लोक वेठबिगार या पद्धतीने गरिबांना राबवून घेत असत अशा या वेट बिगाराच्या संपूर्ण जीवनावर जमीनदाराचा हक्क असे. ही एक प्रकारे गुलामगिरी होती या कायद्याने ही मानवी गुलामगिरीची पद्धत बंद करण्यात आली. [१०]

१८५६ च्या कायद्यामुळे भारतात धर्मशास्त्रानुसार हिंदू विधवा स्त्रीला पुनर्विवाह करण्यास परवानगी नव्हती. जरठ बालविवाह पद्धती रुढ होती. त्यामुळे विधवांचे आयुष्य कठीण असे होते. तिला अमानुषतेने वागविले जाई प्रामुख्याने महाराष्ट्रात ही प्रथा मोठ्या प्रमाणावर चालू होती ही परिस्थिती सुधारण्यासाठी कायदा करण्यात आला. त्यानुसार भारतीय विधवांना पुनर्विवाहास परवानगी मिळाली. [११]

**शिक्षण विषयक सुधारणा :-**

भारतात ब्रिटिशांचे राज्य स्थापन झाल्यानंतर खऱ्या अर्थाने विनामूल्य तत्त्वावर काही शाळा ख्रिश्चन मिशनरी या मंडळींनी काढल्या व शिक्षण देण्यास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात शाळा काढणाऱ्याचा हेतू काहीही असला तरी कालांतराने मात्र पाश्चात्य शिक्षण पद्धतीने स्वीकारलेले भारतातही लागू करण्यात आले या शिक्षण पद्धतीनुसार शिक्षणाचा धर्मशास्त्राशी असलेला संबंध नाहीसा करण्यात आला. त्यानुसार राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान इत्यादी विषय शिकवले जाणाऱ्यावर भर देण्यात आला. [१२] या विषयाचा अभ्यास करण्याचे भारतीयांना चांगली संधी उपलब्ध झाली. जागतिक इतिहासाचा अभ्यासाचा समावेश झाल्याने इंग्लंडमधील लोकशाहीचा विकास, अमेरिकेने स्वातंत्र्य युद्ध, फ्रेंच राज्यक्रांती, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव यांचा प्रभाव यातून दिसू लागला. यातून सुशिक्षातांच्या नव विचारांना चालना मिळत गेली.

**शाळांची स्थापना आणि विस्तार :-**

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनची मुंबई प्रांतात पहिला गव्हर्नर म्हणून नेमणूक १८१९ मध्ये झाली. त्याआधी पुणे नागपूर या ठिकाणी त्यांनी काम पाहिले होते. त्यांनी भारतीयांसाठी उदारमतवादी शिक्षणाचा पुरस्कार केला धार्मिक कार्यासाठी इंग्रजी शिक्षण देण्यापेक्षा सर्व विद्या शाखांचे व्यापक शिक्षण दिले जावे म्हणून त्याने पाठिंबा दिला त्यासाठी त्यांनी मोठी आर्थिक मदत देण्याचे ठरविले त्याचा हा मानवतावादी, उदार दृष्टिकोन त्या वेळच्या विचारवंतांना स्वागतार्ह वाटला त्यांनी या संधीचा फायदा घेऊन भारतीयांना धर्मनिरपेक्ष ज्ञान देण्यासाठी शाळा चालू केल्या. [१३]

धर्मनिरपेक्ष व ऐहिक ज्ञानामुळे भारतातील लोकांना विज्ञानाचा वैज्ञानिक पद्धतीचा परिचय होऊन त्यांच्यातील अंधश्रद्धा कमी होतील. अज्ञान, रोगराई, दारिद्र्य यासारख्या अनिष्ट गोष्टी पासून मुक्त होण्यासाठी जे प्रयत्न करतील अशा अपेक्षेने या अधिकाऱ्याने मुंबई प्रांतात शिक्षणाकरिता त्याने अनेक योजना केल्या. १८३५ पासून इंग्रजी भाषेतून पाश्चात्य शिक्षण सर्व शाळातून देण्यास सुरुवात झाली. शाळा महाविद्यालयामधून शिक्षण घेणाऱ्यास सरकारी नोकऱ्या देण्यात येतील असे सरकारने जाहीर केले. [१४]

त्यातूनच शाळा कॉलेजमधूनच शिक्षण घेण्याची भारतीयांची मानसिकता तयार होऊ लागली. शिक्षण घेणाऱ्यांची संख्या जशी जशी वाढू लागली तशी तशी शाळा कॉलेजची संख्या ही वाढू लागली. त्यातच आधुनिक भारतीय शिक्षण पद्धतीची सुरुवात चार्लस वूडमुळे झाली. लॉर्ड उलहौसी भारताचा गव्हर्नर जनरल असताना त्यांनी शिक्षण विषयक एक समिती नेमली. त्या समितीचा अध्यक्ष सर चार्ल्स वूड हा होता. त्या समितीने 19 जुलै 1854 रोजी आपला अहवाल सादर केला तोच अहवाल पुढचा खलिता म्हणून प्रसिद्ध आहे. त्यानुसार भारतातील शिक्षणावर भर देण्यात आला. [१५]

वूडच्या खलीत्यानुसार १. प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालय अशी तरतूद करण्यात आली. २. हुशार विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व खाजगी महाविद्यालयांना अनुदानाची शिफारस करण्यात आली. ३. प्रत्येक प्रांतात एक शिक्षण खाते उघडून निरीक्षणासाठी निरीक्षकाची नेमणूक करण्याचे सुचविण्यात आले. ४. स्त्री शिक्षण शिक्षकांचे प्रशिक्षण यावर भर देण्यात आला. ५. प्रादेशिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे व शिक्षण निधर्मी असावी असे सुचविण्यात आले. [१६]
लॉर्ड डल हौसीने या वूडच्या शिफारशी मंजूर करून त्या नुसार सर्व प्रांतांमध्ये शिक्षण खाते उघडण्यात आले. कलकत्ता, मुंबई, मद्रास येथे विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली अशा प्रकारे पाश्चात्य शिक्षणाची भारतात सुरुवात झाल्याने त्याचे अनेक परिणाम दिसून आले. भारतातील प्रबोधनाची सुरुवात होण्यास त्यामुळे मोठा हातभार लागला. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रसारामुळे अनेक चांगले परिणाम भारतात दिसू लागले. [१७] पाश्चात्य विचाराची ओळख भारतीयांना झाली. समता, स्वातंत्र्य, बंधुता या फ्रेंच क्रांतीतून उदयाला आलेल्या विचाराची ओळख झाली. तसेच लोकशाही कायद्यासमोर सर्व समान कायद्याचे राज्य या विचाराच्या प्रभावामुळे जनजागृती होऊन भारतात सामाजिक सुधारणाचे एक नवे युग अवतरले असे दिसते. इंग्रजी शिक्षणामुळे भारतामध्ये एक नव्या वर्गाचा जन्म झाला. या वर्गाने समाजातील अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरा दूर करण्यासाठी प्रयत्न केले. क) भारतीयांमध्ये ऐक्याची भावना निर्माण होऊन अन्यायाला विरोध करण्याची सुरुवात झाली. ड) समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी विविध संस्था उदयास आल्या. इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांना पाश्चात्य संस्कृतीचे ज्ञान झाले व आपल्या त्रुटीची जाणीव होऊ लागली. [१८]

अशाप्रकारे ब्रिटिश कालीन भारतीय प्रबोधन आणि सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक बदलास सुरुवात होऊन एका नव्या आधुनिक भारताच्या निर्मितीचा पाया खऱ्या अर्थाने घातला गेला असे आपणास म्हणता येईल.

**संदर्भसूची :-**

१. आधुनिक भारत - र.म. लोहार, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे ३०, पुनर्मुद्रन ऑगस्ट १९९१, पृष्ठ क्रमांक ९९

२. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक १०२

३. आधुनिक भारत - आचार्य श.द. जावडेकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३०, पुनमुद्रण १९९४, पृष्ठ क्रमांक ११६

४. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक १३६

५. आधुनिक हिंदुस्तानचा इतिहास - डॉ. जयसिंगराव पवार, वसुंधा पवार, विद्या प्रकाशन नागपूर द्वितीया कृती जुलै १९९२, पृष्ठ क्रमांक १४२

६. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक १४४

७. आधुनिक भारताचा इतिहास - व्ही.डी. महाजन, एस चन्द अँड कंपनी लिमिटेड रामनगर दिल्ली जानेवारी १९९०, पृष्ठ क्रमांक २१६

८. उपरोक्त -पृष्ठ क्रमांक २१८

९. आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. प्र.न. देशपांडे, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपुरा औरंगाबाद, जून २००४, पृष्ठ क्रमांक ४२

१०. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक ४४

११. आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. श्रीनिवास सातभाई, विद्या बुक पब्लिशर्स औरंगपुरा औरंगाबाद जून २००८, पृष्ठ क्रमांक ३९३

१२. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक ३९६

१३. आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. शांता कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००८, पृष्ठ क्रमांक २३२

१४. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक २४४

१५. आधुनिक भारत का इतिहास- ग्रोवर यशपाल, एस चन्द प्रकाशन दिल्ली १९९०, पृष्ठ क्रमांक ३२२

१६. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक ३२९

१७. उपरोक्त- पृष्ठ क्रमांक ३२२

१८. सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र - बी. एम. कऱ्हाडे पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर, २०११, पृष्ठ क्रमांक २०४